सातारा दि.०८/०७/२०२४

# प्रसिध्दीपत्रक
# सातारा पोलीस भरती २०२२-२३
# कौशल्य चाचणीबाबत

सातारा जिल्हा पोलीस भरती २०२२-२३ मधील चालक पोलीस शिपाई यांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी करिता निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी सातारा जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत प्रसिध्दी माध्यम Facebook, Twitter तसेच www.satarapolice.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०४/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने दि.१०/०७/२०२४ ते दि.१२/०७/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा पोलीस परेड ग्राऊंड, हजेरी माळ, सातारा येथे कौशल्य चाचणी घेण्यात येणार आहे. निवड यादीतील **सर्व चालक उमेदवार** यांना त्यांचे मोबाईल क्रमांकवर व ई-मेल आयडीवर कौशल्य चाचणीची तारीख व वेळ याची माहिती पाठविण्यात आली आहे.

तसेच निवड यादीतील **सर्व बॅण्डस्मन उमेदवारांची** कौशल्य चाचणी दि.१०/०७/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा पोलीस परेड ग्राऊंड, हजेरी माळ, सातारा येथे घेण्यात येणार आहे त्याबाबत उमेदवारांचे मोबाईल क्रमांक व ई-मेलवर कौशल्य चाचणीची तारीख व वेळ याची माहिती पाठविण्यात आली आहे.

कौशल्य चाचणी करिता बोलवविण्यात आलेल्या उमेदवारांनी सोबत सातारा पोलीस भरती २०२२-२३ चे हॉल तिकीट व मुळ वाहन चालविण्याचा परवाना, मुळ ओळखपत्र पुरावा (आधार कार्ड, पॅन कार्ड इ.) व नजिकच्या काळातील चार फोटो व (बॅण्डस्मन उमेदवारांनी आपलेकडील संगीताचे वाद्य) घेवुन उपस्थित रहावे. तसेच बाहेर गावचे उमेदवारांची राहण्याची व्यवस्था अलंकार हॉल, तालीम संघ शेजारी, सातारा येथे करण्यात आलेली आहे. उमेदवारांना काही अडचण असल्यास सातारा नियंत्रण कक्ष क्र.०२१६२-२३४१३० व मेल आयडी. sp.satara@mahapolice.gov.in यावर संपर्क साधावा.

**शुध्दीपत्रक**

दि.०४/०७/२०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या पोलीस शिपाई पदाचे यादीचे अनुषंगाने उमेदवार १) सोमनाथ पांडुरंग क्षीरसागर, चेस्ट क्र.८९२, २) अनिकेत बापु जाधव चेस्ट क्र.५८३, ३) अमिषा देविदास कोकणी चेस्ट क्र.६३५६ यांची नावे दि.०४/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या पोलीस शिपाई पदाचे यादी मध्ये समाविष्ट नसल्याने नमुद उमेदवारांनी सामाजिक / समांतर आरक्षणाचा लाभ मिळावा म्हणून आक्षेप नोंदविलेले होते.

वरील उमेदवारांचे आक्षेपांचे अनुषंगाने कागदपत्रांची व इतर अभिलेखाची योग्य ती पडताळणी करण्यात येवून नमुद तीन उमेदवारांची नांवे पोलीस भरती समितीच्या निर्णयान्वये दि.०४/०७/२०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या पोलीस शिपाई पदाचे तात्पुरत्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

**( समीर शेख )**
**पोलीस अधीक्षक, सातारा.**